# बीड जिल्ह्यात कला केंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसायाचे रॅकेट सक्रिय..!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564







■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २१७ ■ शुक्रवार दि.२५ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 217 ■ Friday Dt.25 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# एसपी साहेब, कुठल्या तोऱ्यात बीडमध्ये वेश्याव्यवसाय जोरात?

## केज तालुक्यातील उमरी शिवारातील वेश्या व्यवसायावर कारवाई होते मग बीड शहरातील वेश्याव्यवसायवर का होत नाही?

- पोलिस अधिकाऱ्यांना दरमहा घसघशीत 'दाम' मिळत असल्याची नागरिकांमध्ये उघड चर्चा?
- बीड शहरात पोलिसांना न जुमानता वेश्याव्यवसाय सुरु; याला पाठबळ कुणाचे?
- पोलिसांना माहीत असूनही या अवैध वेश्या व्यवसायाकडे सोयीस्करपणे कानाडोळा?
- अनेकांच्या आयुष्याची राखरांगोळी करणाऱ्या वेश्या व्यवसायाला पायबंद कोण घालणार?
- अल्पवयीन मुलीचा समावेश, वरदहस्त देणाऱ्या अधिकाऱ्यांना सुखावणारे कोण?

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील काही मोजक्या टोळ्यांकडून हा व्यवसाय चालविला जात असून महिन्याला कोट्यवधींची उलाढाल सुरू आहे. या व्यवसायावर कारवाई करण्यासाठी शहर गुन्हे अन्वेषण शाखेमध्ये खास पथक असून देखील त्यांच्याकडून व स्थानिक पोलिसांकडून 'अर्थपूर्ण' गोष्टीमुळे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे या टोळ्यांना पोलिसांची भीती राहिलेली नाही.

बीड शहराचा वेगाने विस्तार होत असून गुन्हेगारीचे माहेरघर म्हणून बीडची ओळख आहे. या ठिकाणी गुन्हे करणाऱ्यांची मोठी संख्या आहे. तसेच, वेगवेगळ्या ठिकाणी देखील अनेक विद्यार्थी कामासाठी व शिक्षणासाठी येत आहे पण त्यांच्यावर वेश्याव्यवसायातील टोळ्यांनी लक्ष केंद्रित



केले आहे जणू काही बीड अन् गुन्हेगारी हे नवीन समीकरणचं जणू निर्माण झालंय. गुन्हेगारी, मारहाण, अपहरण या घटना काही बीडला नवीन नाहीत. अशातच पुन्हा आता एका धक्कादायक बाब समोर आली आहे. केज तालुक्यात कला केंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरू असल्याचा प्रकार उघड झालाय. एका लोकनाट्य संस्कृती कला केंद्रावर बीडच्या नियंत्रण कक्ष व अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कक्षाच्या पथकाने छापा मारत वेश्या व्यवसायाचा प्रकार उघडकीस आणला. या छतात कला केंद्राची मालकीण व मॅनेजर हे कर जिल्ह्यातील महिलांना केंद्रावर आणून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे उघडकीस आले याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून मॅनेजरला अटक देखील केली आहे. तसेच बेकायदेशीर सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाकडे पोलीस प्रशासनाचे शाप दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. पोलिसांसोबत संगनमत करून काही लॉजचे मालक अवैध धंद्यांचा आश्रय घेत आहेत. आंबटशौकिनांचे नको ते चोचले पुरवण्यासाठी

पान २ वर




### उमरी शिवारातील कला केंद्रावर पोलिसांचा छापा; दहा पिढीत महिलांची केली सुटका

केज तालुक्यातील उमरी शिवारातील महालक्ष्मी लोकनाट्य सांस्कृतिक कला केंद्राचे चालक आणि मॅनेजर हे परजिल्ह्यांतून आणलेल्या महिलांकडून वेश्याव्यवसाय करूनघेत असल्याची माहिती पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांना मिळाली होती. या माहितीवरून नियंत्रण कक्षाचे सहायक पोलिस निरीक्षक मधुसूदन घुगे व अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कक्षाच्या सहायक पोलिस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्या पथकाने रविवार, २४ एप्रिल रोजी मध्यरात्री ३.३० वाजता कला केंद्रावर एक डमी ग्राहक पाठवत दोन पंचांसह छापा मारला. पोलिसांनी या कला केंद्रातील दहापीडित महिलांची सुटका केली. सहायक पोलिस निरीक्षक मधुसूदन घुगे यांच्या तक्रारीवरून आंटी सत्त्वशीला अंधारे, आदित्य अंधारे, मयूर अंधारे या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी मॅनेजर मयूर अंधारे यास ताब्यात घेतले असून तपास पोलिस निरीक्षक वैभव पाटील हे करीत आहेत.

---

## नोकरीचे प्रलोभन दाखवत फसवणूक; दोघांवर गुन्हा

# किनवट परिसरातील तरुणांना १ कोटींचा गंडा

नांदेड । प्रतिनिधी

भारतीय रेल्वेत नोकरी लावतो असे सांगून किनवट व परिसरातील तरुणांना १ कोटी ११ लाख रुपयांना गंडा घालणा–या दोघांविरुद्ध किनवट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेवून या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हा शाखेकडे वर्ग करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

किनवट व परिसरातील काही तरुणांना भारतीय रेल्वेत नोकरी लावण्याचे आमीष दाखवून हरेंद्र भारती, आशीष पांडे (दोघेही राहणार नवी दिल्ली) व रेल्वे विभागातील काही अधिकारी यांनी अनेक तरुणांना फसविले. भारतीय रेल्वेतील लिपीक पदासाठी जागा उपलब्ध असल्याचे सांगून त्यासाठी पैसे मोजावे लागतील, असे सांगून आरोपींनी वेगवेगळ्या तरुणांकडून एकूण १ कोटी ११ लाख ८६ हजार रुपये जमा केले. पैसे घेतांना संबंधितांनी नेमणुकीची बनावट कागदपत्रे, ओळखपत्रे ई–मेलद्वारे पाठविले. उत्तरप्रदेशातील हापूर येथे प्रशिक्षणासाठी बोलावण्यात आले. २० दिवस तेथे थांबूनही ना प्रशिक्षण झाले, ना कुठली नियुक्ती झाली. काही दिवसांनंतर संबंधितांनी आपले दूरध्वनी बंद केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गजाजन बाबू जाधव (वय २५, रा. सुभाषनगर,




किनवट) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हरेंद्र भारती, आशीष पांडे व अन्य संशयितांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात किनवट पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक देविदास चोपडे हे अधिक तपास करीत आहेत. घटनेचे गांभीर्य व व्याप्ती लक्षात घेवून या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला जाणार आहे. दोन आरोपींची नावे समोर आली असली तरी यात आणखी कोणाकोणाची सहभाग आहे, याचा शोध सुरु आहे. ग्रामीण भागातील अनेक तरुण वेगवेगळ्या नोकरीच्या शोधात असतात. काहीजण याचाच फायदा घेऊन स्वतःचे आर्थिक हित सांभाळण्यासाठी त्यांची फसवणूक करतात. किनवट सारख्या आदिवासीबहूल भागात फसवणुकीचे प्रकार सुरु आहेत. प्रशासनाने याबाबतीत वेळोवेळी आवाहन करुनही तरुण मात्र दलालांच्या प्रलोभणाला बळी पडत आहेत.

---

# बुलेटवर दारु वाहतुक करणारा पकडला

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

गेवराई । प्रतिनिधी

अंबाजोगाई उपविभाग मध्ये चालणारे अवैध धंद्यांची गोपनिय माहीती काढुन कडक कारवाई करण्याचे आदेश वरीष्ठांनी दिले होते. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेला गोपनिय बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की परळी येथे उड्डाणपुलाकडुन माता रमाई चौकाकडे बुलेटवर अवैध दारुची वाहतुक होत आहे अशी माहीती मिळालेवरुन माता रमाई चौकामध्ये स्थानिक गुन्हे शाखेने सापळा लावुन थांबले असता



समोरुन येणाऱ्या बुलेटला हाथ करुन थांबवले असता वाल्मिक कुंडलिंग पाचांगे, वय ५० वर्ष, रा पांगरी कॅम्प, परळी वै जि.बीड याचे ताब्यात अवैध विदेशी दारु मिळुन आली आरोपी विरुध्द दिनांक २४.०४.२०२५ रोजी पोलीस ठाणे संभाजीनगरर गु.र.नं ८१/२०२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. त्याचे ताब्यातुन एक बुलेट व विदेशी दारु असा एकुण १,६२,४०० रु मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरील कारवाई हि श्री नवनीत कॉंवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, श्री उस्मान शेख, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, नितीन वडमारे, स्वाती मुंडे यांनी केली आहे.

---

## धारूर नगरपरिषदेचा कारभार शहरातल्या पाण्याच्या सर्व बोरपैकी जास्तीच पाणी असलेली बोर धारूर नगरपरिषदेने बुजवली

# नगरपरिषदेला नेमके सिद्ध काय करायचे आहे?

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरामध्ये मुख्य रस्त्याचे काम सध्या धिम्या गतीने चालू असल्याने नागरिकांना बाजारात फिरण्यासाठी मोठा नाहक त्रास सहन करून सुद्धा धारूर नगरपरिषदेने मुख्य रस्त्यावरील मुख्यबाजार पेठेतील बालाजी मंदिरा जवळील चालू असलेली बोरवेल रस्त्याच्या कामासाठी क्रिसिन उकरून काढून ते बोर बुजून टाकला आहे.

बोर बुजवल्यानंतर काही दिवसांनी सामाजिक कार्यकर्ते व पत्रकारांनी मुख्याधिकारी यांना विचारल्यानंतर काही दिवसात चालू करू किंवा नवीन बोर साठी प्रयत्न करू असल्याचे बोलले होते मात्र दिवसेंदिवस उलटूनही आज महिना झाला असला तरी सर्वाधिक पाणी असलेली बोर बुजलेलाच आहे. या प्रकाराकडे नगरपरिषद प्रशासन पूर्ण:त दुर्लक्ष करीत असल्याने भर उन्हाळ्यात नागरिकांना पाणी टंचाईचा सामना सोसावा लागत आहे. रकरक्त्या

पान २ वर




### अबब! त्याच बोरमधील बिघडलेल्या दोन मोटार दुरुस्तीकामी नेल्या अन् गायबच केल्या?

मुख्य बाजारपेठेतील बालाजी मंदिरा जवळील चालू असलेली बोर नगरपरिषद प्रशासनाने रस्त्याच्या कामासाठी चालू बोर बुजवला मात्र तीच बोर चालू असताना मागच्या काही महिन्यात दोनदा बोरच्या आतील मोटार बिघडल्याने नगरपरिषद प्रशासनाने दुरुस्तीच्या कामासाठी घेऊन गेले त्या दोन मोटरी अद्यापही गायब असल्याचा बोलले जात आहे. दुरुस्तीच्या नावे घेऊन गेलेल्या त्या दोन मोटरी कुठे गेल्या याची मुख्याधिकारी यांना माहिती आहे का असा प्रश्न पडला आहे.

# बेकायदेशीर असलेले अतिक्रमण काढायला गेवराई नगरपरिषदेला वेळ मिळेना..!

## ■ अद्याप कोणतीही कारवाई नाही; स्थानिक व्यापाऱ्यांचा आरोप
## ■ रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची व्यापाऱ्यांची मागणी, कर्मचाऱ्याकडून उडवाउडवीचे उत्तरे?
## ■ राजकीय पुढाऱ्यांच्या आशीर्वादामुळे हा प्रश्न प्रलंबित?



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात सर्वत्र अतिक्रमण होत आहे. तसेच, अनधिकृत बांधकामे सर्रासपणे सुरू आहेत. त्यामुळे शहर बकाल होत असून, अतिक्रमणामुळे वाहतूक रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. कर्मचाऱ्यांच्या निर्लज्ज कृत्यामुळे अद्याप कोणताही निष्कर्ष निघालेला नाही, कारण आजपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, ज्यामुळे स्थानिक व्यापारी संतप्त झाले आहेत. स्थानिक प्रशासकीय अधिकारी या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश कनिष्ठ अधिकाऱ्यांना देण्याचा जुना खेळ खेळत आहेत. या अतिक्रमणावर आठवड्यापासून धडक कारवाई करण्याची ग्वाही मुख्याधिकारी महोदयांनी दिली मात्र, वीस दिवस उलटूनही अद्याप ठोस कारवाई सुरू न झाल्याने राजकीय दबावाला बळी पडल्याची चर्चा वर्तुळात रंगली आहे.

गेवराई नगरपालिकेच्या वतीने गेल्या अनेक दिवसापासून धडक कारवाई मोहीम जवळजवळ ठप्पच झाली आहे. त्याकाळी असलेले अतिक्रमण विभागाचे अधिकारी येवले व रानमारे यांना नोटीस काढण्याचे आदेश देखील दिले होते परंतु त्यांनी या प्रकरणाकडे राजकीय दृष्ट्या दुर्लक्ष केले असावे असा अंदाज व्यापारी बांधवांनी व्यक्त केला व्यापारी बांधवांनी वेळोवेळी निवेदन देऊन सुद्धा न्याय मिळत नसेल तर दुर्दैव. तसेच विद्यमान अतिक्रमण प्रमुख राम सौंदरमल वरिष्ठांकडून आमच्याकडे अजून पत्र आले नाही.

आल्याच्या नंतर कारवाई करू असे बोलून थेट अंग झटकवतात अशा गैरकारभारामुळे सर्वच अडचणीला सामना करावा लागत आहे व त्यांच्या काळात झालेल्या कारवाईच्या ठिकाणी पुन्हा पत्राशेड, टपर्या व इमारती निर्माण झाल्या आहेत.नगरपरिषदेच्या गाळा क्रमांक १५ ते २५ च्या दक्षिणेकडील जुन्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्या संदर्भात तत्कालीन मुख्याधिकारी विशाल भोसले साहेब यांनी गेल्या अनेक वेळेस व्यापाऱ्यांना तोंडी शब्द दिला होता की मी एक ते दीड महिन्यामध्ये अतिक्रमण काढून तुम्हाला रस्ता मोकळा करून देतो परंतु त्यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे अतिक्रमण हटवण्याची कारवाई बदली झाल्यामुळे केली नाही तरी आपल्या कार्यालयाने त्यातल्याही प्रकारची अद्याप दखल घेतली नाही तरी दिलेल्या आश्वासनाकडे सध्याचे मुख्य अधिकारी विक्रम मांडुरके यांनी लक्ष घालावे अशी मागणी व्यापारी बांधवाकडून होत आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षितांच्या प्रगतीसाठी लढा उभा केला : पप्पू कागदे

बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी व उपेक्षितांना त्यांच्या हक्काची व अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी जाती व्यवस्था बदलण्याचे काम करीत भारतीय संविधानाची निर्मिती करून भारतीय लोकशाही मजबूत केली. त्याचबरोबर, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय प्रवाहात आणण्यासाठी व साक्षर समाज घडविण्यासाठी शिक्षणाची दारे खुली केली. आपल्या हक्क व अधिकारांसाठी लढण्यास प्रवृत्त केले. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारीत असलेली समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करीत समाज बांधवांच्या प्रगतीसाठी देशभर लढा उभा केला, असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त तलवाडा, घाटसावळी, पारगांव (सि), नाळवंडी, ताडसोन्ना या गांवी केले.



पुढे बोलतांना पप्पू कागदे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षांची गुलामगीरी नष्ट करून अठरा पगड जातीच्या समाज बांधवांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधानात अनेक कलमांची नोंद करून त्याचे हक्क व अधिकार मिळवून दिले. थोर महापुरुषांचे विचार आत्मसात करून आगामी काळात युवकांनी व्यसनमुक्त समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी महापुरुषांचे विचार घरा-घरात व गावा-गावात पोहचविण्याचे काम करावे. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडीत, किशोर कांडेकर, किसन तांगडे, शाहु डोळस, सुभाष तांगडे, संजय गव्हाणे, भैय्या भालेराव, आप्पा भालेराव, सुनिल कांडेकर, भाऊसाहेब भालेराव, विजय डोंगरे, अशोक आठवले, विनोद आठवले, आंबादास आठवले, युवराज डोंगरे, गिताराम डोंगरे,माऊली डोंगरे,नामदेव वाघमारे यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.



डोईफोडवाडी तालुका बीड येथे वडजाई देवीच्या यात्रेनिमित्ताने झाली अटीतटीची मातीवरील कुस्त्यांची दंगल. (छाया तात्यासाहेब डोईफोडे)

# संत गोरोबाकाका यांची पुण्यतिथी घराघरात साजरी करा : अंकुश ईतापुरे

बीड । प्रतिनिधी

संत गोरा कुंभार हे वारकरी संप्रदायातील महाराष्ट्रातील संत होते. हे विठ्ठलाचे मोठे भक्त असून यांनी अनेक अभंग लिहिले आहे. यांचा जन्म शके ११८९ इ.स.१२६७ साली तेरढोकी पंढरपूर जवळ या ठिकाणी झाला असे मानले जाते. त्यांच्या वडिलांचे नाव माधवबुवा आणि आईचे नाव रखुमाई होते. त्यांना सर्व जण गोरोबा काका म्हणून हाक द्यायचे. तेर नगरीत गोरोबा यांचे कुटुंब धार्मिक वृत्तीचे होते. यांचे कुटुंबीय 'काळेश्वर' या ग्राम देवतांचे उपासक होते. त्यांचे आई वडील कुंभारकाम करून आपला उदरनिर्वाह करायचे. त्यांचे वडील गावात संत माधव बुवा म्हणून ओळखले जायचे. त्यांना आठ अपत्ये झाली पण दुर्दैवाने ते फार काळ जगली नाही. आपल्या आठही मुलांना त्याने दारुण हृदयाने पुरले. पण ईश्वराची किमयाच वेगळी पांडुरंग साक्षात माधवबुवांच्या घरी ब्राह्मणाचे वेष घेऊन आले

आणि त्यांना दुखी होण्याचं कारण विचारले. त्यावर माझ्या मुलांना मी माझ्या हाताने पुरले आहे आणि माझे आठही मुलं देवाने नेले. असे सांगितल्यावर पांडुरंगाने माधवबुवांना ज्या जागी मुलांचे मृतदेह पुरले आहे तेदाखवण्यास सांगितले आणि प्रेत बाहेर काढण्यास सांगितली. पांडुरंगाने सांगितल्या प्रमाणे त्यांनी प्रेत काढले आणि पांडुरंगाने त्या सात ही मुलांना जिवंत केले आणि स्वर्गात पाठवणी केली. नंतर त्यांनी आठव्या मुलाला देखील जिवंत केला आणि तो देखील स्वर्गाकडे जायला निघाला तेवढ्यात पांडुरंगाने त्यांना थांबविले आणि माधवबुवा आणि रखुमाईच्या हातात दिले आणि म्हणाले गोरीतून काढल्यामुळे ह्याचे नाव गोरोबा असेल. अशी आख्यायिका आहे. गोरोबा पेशाने कुंभार होते. संतश्रेष्ठ नामदेव व ज्ञानेश्वरांचे ते समकालीन होते, संत गोराबा हे ज्ञानेश्वर, निवृतीनाथ, मुक्ताबाई, सोपान आदि संत मंडळींमध्ये वयाने सर्वांहून वडीलधारी होते.



त्यामुळे सर्व जण त्यांना गोरोबाकाका म्हणत असत. संत गोरोबांनी ज्ञानेश्वरांच्या सांगण्यावरून निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई, संत नामदेव, चोखामेळा, विसोबा खेचर आदि संताची,'कोणाचे मडके (डोके) किती पक्के'अशी प्रत्येकाच्या डोक्यावर मारून परीक्षा घेतली. तेव्हा संत नामदेवांना या गोष्टीचा राग आला होता, त्यावेळी ज्ञानेश्वरांनी त्यांना गुरूपदेश घ्यावयास सांगितले. तेव्हा संत नामदेवांनी विठोबा खेचरांना आपले गुरू केले. संत गोरा कुंभार यांचा विवाह संतीशी झाला. त्यांना एक गोंडस बाळ झालं. नंतर त्यांनी रामी यांच्याशी लग्न केले.

संत गोरोबा सतत श्री विठ्ठलाचे स्मरण करत, भक्तिरसात ते देहभान विसरून हरवून जात. त्यांची पत्नी गोरोबांना त्यांच्या लहानग्या बाळाकडे लक्ष ठेवयास सांगून पाणी आणवयास गेली असता, श्री विठ्ठलाचे स्मरण करता करता त्यांना, लहानग्या बाळास मडकी घडविण्यासाठी लागणारी माती तुडविण्यासाठी चिखलात रांगणारे लहानगे बाळ जवळ आले आणि मातीत त्यांच्याच पायाखाली गाडले गेल्याचे समजले नाही. त्यांची पत्नी पाणी घेऊन येईपर्यंत लहानगे बाळ गतप्राण झाले होते. तिच्या हंबरड्याने गोरोबांना जाग आली व ते पश्चाताप करु लागले. नंतर विठ्ठलाच्या कृपेने त्यांचे मुल जिवंत झाले. (अशी अख्यायिका सांगितली जाते.)

संत गोरोबांनी शके १२३९ मध्ये २० एप्रिल १३१७ रोजी समाधी घेतली. संत गोरोबा कुंभारांची समाधी उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरढोकी गावात आहे. या समाधी जवळ एक मंदिर आहे. संत गोरोबाकाका यांची पुण्यतिथी घराघरात साजरी करण्याचा आव्हान कुंभार समाजाचे युवा नेते अंकुश ईतापुरे यांनी केले आहे.

# गर्दीचा फायदा घेवून महिलांचे गंठण, चैन चोरणारी महिलांची टोळी जेरबंद

### बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी!

गेवराई । प्रतिनिधी

अंबाजोगाई उपविभागातील दाखल होणाऱ्या चोऱ्या, घरफोडयाचा संमातर तपास करुन आरोपीचा शोध घेवुन गुन्हयातील गेला माल हस्तगत करणे बाबत आदेश वरीष्ठांनी दिले होते. त्या अनुषंगाने दिनांक १३/११/२०२४ रोजी हलगे गार्डन, परळी वैजनाथ येथे शिवकथेचा महाप्रसादाचे वाटपाचे ठिकाणी महीलेच्या गर्दीमधुन एका महीलेच्या गळयातील सोन्याचे गंठण व दुसऱ्या महीलेच्या गळयातील सोन्याची चैन अज्ञात महीलांनी चोरुन नेल्याचे घटना घडली होती त्यावरुन अज्ञात महीलां आरोपीविरुध्द पोलीस ठाणे परळी शहर येथे चोरीचा गुन्हा दाखल झालेला होता.



स्थानिक गुन्हे शाखेला गोपनिय बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की सदरील चोरी बीड येथील गांधी नगर भागातील महीलांनी केली असुन त्या महीला नाळवंडी नाका बीड येथे उभ्या आहेत व ते त्याचे कडे चोरलेले सोन्याचे गंठण व चैन विक्री करण्यासाठी जात आहेत या माहीतीवरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने १) शालनबाई लक्ष्मण जाधव, वय ५८ वर्ष, रा. गांधी नगर, बीड २) केसरबाई सुखदेव जाधव वय ५३ वर्षे रा. गांधी नगर, बीड पकडले, त्याचेकडे परळी येथे झालेल्या महीलांचे गळयातील दागीचे बाबत चौकशी केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीचे उत्तरे दिली त्यानंतर त्यांना अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी गर्दीचा फायदा घेवुन महीलांचे गळयातील गंठण व चैन चोरल्याचे प्राथमिक चौकशीअंती निष्पन्न झाले असुन त्यांनी चोरी केल्याचे कबुल केले आहे, त्याचे ताब्यातुन दोन तोळयाचे सोन्याचे गंठण व अडीच तोळयाची चैन असे एकुण ४५ ग्रॅम सोने किमती २,६५,००० रु जप्त करुन आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे परळी शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरील महीला आरोपींवर बीड सह ईतर जिल्हयात देखील या प्रकारचे गुन्हे दाखल असुन त्या महीला बसस्थानक,लग्न व गर्दीच्या ठिकाणी जावुन महीलांचे गळयातील सोन्याचे दागीणे चोरण्याचे सवईचे आहेत. सोने परत मिळणार यामुळे तक्रारदार महीलांनी समाधान व्यक्त केले आहे.

सदरील कारवाई हि श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, बीड, श्री उस्मान शेख, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, नितीन वडमारे, सचिन कोरडे, सचिन आंधळे, विकी सुरवसे, सुशीला हजारे, स्वाती मुंडे यांनी केली आहे.

# पुतण्यानेच केली काकाची सुरी खुपसून हत्या; आरोपीस जन्मठेपेची शिक्षा

## आनंद एल. यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड यांचा महत्वपुर्ण निकाल

बीड । प्रतिनिधी

पिंपळनेर, ता.जि. बीड रागाच्या भरात फिर्यादी मयत याच्या पोटावर सुरीने वार करून खुन केल्या प्रकरणी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. आनंद एल. यावलकर साहेब यांनी आरोपी फारूक रमजान कुरेशी रा. पिंपळनेर, ता.जि. बीड यास कलम ३०२ भादवी प्रमाण दोषी ठरवून दि. २३/०४/२०२५ रोजी जन्मठेपेची वरू १०००/- एवढया दंडाची व दंड न भरल्यास तीन महिने साध्या कैदेची शिक्षा सुनावली आहे.

प्रस्तुत प्रकरणातील थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक २९/०९/२०२० रोजी दुपारी १६.३० सुमारास फिर्यादी मोहमंद शरीफ अबुलगणी कुरेशी हा पिंपळनेर ता.बीड येथील हॉटेलचे समोर गप्पा मारत बसलेला होता. त्यावेळी त्याचा पुतण्या / आरोपी फारू ख रमजान कुरेशी रा. पिंपळनेर ता.बीड हा तेथे आला व लोकांकडे माझे बाबत काय सांगितले असे म्हणुन आरोपीने फिर्यादीचे पोटात जिवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी सुरीने दोन वार करून जखमी केले. सदर वेळी फिर्यादी मोठयाने ओरडला असता आरोपी तेथुन निघुन गेला. त्यांनतर तेथे जमलेल्या लोकांनी फिर्यादीस संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, बीड येथे दाखल केले. फिर्यादीने दिलेल्या मृत्युपुर्व जबाबावरून पिंपळनेर पो. स्टे ता.बीड येथे गु.र.न २८९/२०२० कलम ३०७ भा.द.वि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यांनतर फिर्यादी / जखमी हा संजीवणी मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल बीड येथे उपचार चालु असताना दि ०१/१०/२०२० रोजी सकाळी ०४.०० वा सुमारास मयत झाला व त्यावरून सदर गुन्हयामध्ये भादवी कलम ३०२ हे वाढ करण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी गुन्हा केल्या नंतर आरोपी हा स्वतःहुन पिंपळनेर पो.स्टे येथे हजर झाला होता व त्याने गुन्हा केल्याची माहिती संबंधीत पो. स्टे ला दिली होती. सदर प्रकरणाचा तपास डी.पी. सानप, सहा. पोलीस निरीक्षक, पोस्टे पिंपळनेर ता.बीड यांनी केला. तपासादरम्यान सदरच्या गुन्हयात आरोपी फारूक रमजान कुरेशी रा. पिंपळनेर, ता.बीड यास अटक करण्यात आली. सदर गुन्हयाच्याकामी वापरलेली लोखंडी सुरी आरोपीच्या सांगण्यावरून तपासकामी जप्त करण्यात आली, त्याचबरोबर आरोपीचे कपडे ज्यामध्ये रक्ताचे डाग असेलेला शर्ट जप्त करण्यात आला. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपी विरूद्ध सबळ पुरावा मिळल्यावरून मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बीड यांच्या न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. नंतर सदरचे प्रकरण मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे सुनावणीसाठी वर्ग करण्यात आले. सदर प्रकरणाचा साक्षीपुरावा व सुनावणी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. आनंद एल. यावलकर साहेब यांच्या समोर झाली. सदर प्रकरणात आरोपी विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी सरकार पक्षातर्फे एकुण १५ साक्षीदार तपासण्यात आले. सदर प्रकरणात फिर्यादी / मयत यांचा मृत्युपुर्व जबाब व इतर साक्षीदार यांचे जबाब, इतर परिस्थितीजन्य पुरावा, वैद्यकीय पुरावा यांचे अवलोकन करून जिल्हा सरकारी वकिल व शासकीय अभियोक्ता ॲड. श्री. अजय दि. राख यांचा युक्तिवाद ग्राहय धरून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद एल, यावलकर साहेब यांनी प्रकरणातील आरोपी फारूक रमजान कुरेशी रा. पिंपळनेर ता. बीड यास भा.द.वी कलम ३०२ प्रमाणे दोषी घरून जन्मठेपेची शिक्षा व १०००/- दंड व दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. सदर प्रकरणी सरकारपक्षातर्फे जिल्हा सरकारी वकिल ॲड. अजय दि. राख यांनी काम पाहिले. सदर प्रकरणात पैरवी अधिकारी ए.एस.आय नागमवाड एम.व्ही यांनी त्यांना सहकार्य केले.

पान १ वरून...

### एसपी साहेब, कुठल्या तोऱ्यात बीडमध्ये वेश्याव्यवसाय जोरात?

काही लॉजवर अवैध धंदे जोरात सुरू आहेत. पोलिसांना न जुमानता वेश्याव्यवसाय सुरू आहे.

गुंतवलेले पैसे वसूल करण्यासाठी काही लॉजमालक पैसे कमावण्याचा सोपा मार्ग पत्करतात. तो म्हणजे बाहेरून आलेल्या जोडप्याला लॉजवर जागा देऊन त्यांच्याकडून तासाला भरमसाट पैसा घेणे. अशाप्रकारे सुरू आहे बीड शहरात देखील अनेक ठिकाणी बेकायदेशीर वेश्याव्यवसाय सुरू आहेत परंतु याकडे पोलीस प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. तसेच यामागील मास्टरमाइंड देखील पोलिसांनी शोधून काढावा? दिवसाढवळ्या सुरू असलेल्या वेश्याव्यवसाय कडे पोलिसांचे दुर्लक्ष का? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहे.

केज तालुक्यात एक कला केंद्र चालवले जाते. या कला केंद्रामध्ये वेश्या व्यवसाय चालत असल्याची गुप्त माहिती पोलीसांना मिळाली होती. यानुसार पोलीसांनी काल मध्यरात्री या ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी येथे अनेक रुममध्ये पार्टी नृत्य सुरू असल्याचं दिसून आलं. याप्रकरणी पोलिसांनी छापा मारला परंतु बीड शहरांमध्ये अनेक ठिकाणी सुरू असलेल्या पेशव्याकडे पोलीस प्रशासन कारवाई का करत नाही. याला कुणाचे वरदहस्त आहे का? कुणाच्या दबाव खाली पोलीस प्रशासन कारवाई करत नाही का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पोलीस प्रशासनाने बीड शहरांमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाची तातडीने माहिती घेऊन कारवाई करावी आणि यामागील मास्टरमाईन शोधावा अशी मागणी होत आहे.

### नगरपरिषदेला नेमके सिद्ध काय करायचे आहे?...

उन्हाळ्यात चालू बोर बुजवने म्हणजे तोंडातला घास काढून नागरिकांचा घसा कोरडा करून धारूर नगर परिषदेचे समाधान झाले आहे का.

मागच्या दहा - पंधरा वर्षापासून त्या बोरवरती बहुतांश लोक अवलंबून आहेत धारूर नगरपरिषद गावाला पाणी पंधरा ते वीस दिवसात एकदा सोडते त्यामुळे गरीब कुटुंबातील लोकांना पाणी विकत घेण्यासाठी परवडत नाहीं हे माहित असताना सुद्धा धारूर नगरपरिषद प्रशासनाने अतिक्रमणासोबत चालु बोर हि उकडून काढला असल्याने आधीच तर भर उन्हाळा पडल्याने मागच्या एक महिन्यापासून सर्व नागरिक पाण्याच्या नाहक त्रासाच्या अधीक वेदना भोगत असल्याने धारूर नगरपरिषद प्रशासन नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचं नागरिक बोलत आहेत.

व तात्काळ बुजलेल्या बोर ला वरती काढून चालू करावा व होणाऱ्या पाण्याअभावी गैरसोय सोडुन भर उन्हाळ्यात पाण्यासाठी होणारी भटकंती थांबवावी व मुके जनावरांना पाणी पिण्यासाठी सोय होईल त्यासाठी लवकरच नगरपरिषदेने डोके ठिकाणावर ठेवून बुजलेला बोर चालू करावा अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.

# मेंढपाळाचा मुलगा झाला IPS अधिकारी

## बिरूदेव ढोणे यांचा संघर्षमय प्रवास, निकाल लागला तेव्हा बिरुदेव मेंढ्या चारत होता

बीड । प्रतिनिधी

नुकताच युपीएससी सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचा निकाल लागला. देशभरातून लाखो मुलांनी सर्वस्व पणाला लावलेल्या या परीक्षेत जेमतेम हजारभर विद्यार्थ्यांनी यशाला कमान घातली. कुणी ख–ड तर कुणी खझडतर कुणी इतर पदे मेरिटनुसार पटकावली. यातच बिरदेव डोणे ५५१ व्या क्रमांकाने परीक्षा उत्तीर्ण झाला आणि खझड पदाला त्याने गवसणी घातली.बिरदेव कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील एका मेंढपाळाचा मुलगा. जात्याच हुशार पण घरची परिस्थिती नाजूक. जळोची गावातील डॉ राजेंद्र चोपडे यांचा पुतण्या प्रांजल चोपडे हे लेशला दोन वर्षे ज्युनिअर, सिव्हिल इंजिनिअरिंग चा विद्यार्थी. मुले बिरदेव ची चेष्टा करायची. प्रांजल चोपडे यांनी अवतार पाहूनच ओळखले, हा आपल्यापैकी म्हणजे धनगर जातीचा असणार, आणि नाव विचारल्यावर नावावरून खात्रीच झाली.

बिरदेव ला ही पुण्यासारख्या ठिकाणी कुणीतरी आपलं भेटलं ह्याचं हायसं वाटलं. सिनिअर्स चा त्रास कमी होण्यासाठी बिरदेव प्रांजल यांना चिकटून राहू लागला. दोघांची चांगली गट्टी झाली. प्रांजल यांनी इंजिनिअरिंग झाल्यानंतर वर्षभर नोकरी केली आणि केंद्रीय स्पर्धा परीक्षेचा मार्ग निवडला. पुढे बिरदेव ही सिव्हिल इंजिनिअर झाला आणि त्यानेही स्पर्धा परीक्षेच्या मार्गाने जाण्याचे ठरवले. नोकरीच्या मागे न लागता बिरदेव ह्या परीक्षेच्या बेभरवशी आणि खडतर मार्गावरून चालू लागला.या कठीण प्रवासात सीओई पी मध्येच



शिकणाऱ्या अक्षय सोलनकर याचीही बिरदेव ला वेळोवेळी सगळ्या प्रकारची मदत झाली. प्रांजल चोपडे हे दोन वर्षांपूर्वी णझडउ अंतर्गत फॉरेस्ट ऑफीसर म्हणुन सिलेक्ट झाले. बिरदेव चा यशाचा शोध चालूच होता. तो आज संपला. आज दुपारी युपीएससी चा निकाल आला. प्रांजल चोपडे यांनी यादीत बिरदेव चे नाव शोधले. ५५१ व्या क्रमांकावर बिरदेव चे नाव दिसल्यावर बिरदेव ला बातमी देण्यासाठी आणि अभिनंदन करण्यासाठी फोन लावला. तर बिरदेव भर उन्हात मेंढरे चरायला घेउन माळावर गेलेला.

तू का मेंढरे घेउन गेलास विचारले असता वडील आजारी असल्याने मीच सध्या मेंढरे घेउन जातोय, बिरदेव उत्तरला. बिरदेव च्या वडिलांचे किडनी च्या मुतखड्याचे ऑपरेशन दोन महिन्यापूर्वी झालेले. पैशाची ओढाताण असल्याने बिरदेव ने प्रशिक्षण चालू असलेल्या प्रांजल आणि दुसरा कोल्हापूर चाच मित्र आशिष पाटील (ख–ड) या दोघांना मदतीसाठी फोन केला होता. आशिषची कोल्हापूरचा असल्यामुळे त्याच्या ओळखीने तेथील खाजगी मेडिकल कॉलेजच्या हॉस्पिटलला ऑपरेशन ची सोय केली होती. ऑपरेशन झाले पण काहीतरी लोश्रिळलरींळेप झाले (बिरदेव च्या भाषेत ऑपरेशन बिघडले). तर वडील आजारी असल्याने आमचा हा आय पी एस निकाल लागला त्यादिवशी त्यामुळे मेंढरे घेउन माळावर चारत होता. असा हा बिरदेव चा आय पी एस पर्यंतचा प्रवास.

जाता जाता बिरदेव चा एक किस्सा सांगितला पाहिजे. दुष्काळात तेरावा महिना तसा बिरदेव चा मोबाईल काही दिवसांपूर्वी पुण्यात हरवला. बिरदेव पोलीस तक्रार द्यावी म्हणून पोलिसात गेला. पोलिसांनी तक्रार घ्यायला टाळाटाळ केली. बिरदेवने प्रशिक्षणाला गेलेल्या मित्रांच्या मदतीने पोलीस तक्रार नोंदवली. तक्रार घ्यायलाच टाळाटाळ करणाऱ्या पोलिसांनी तक्रार घेतली पण अजून फोन काही सापडला नाही. बिरदेव अधूनमधून फोन सापडला का विचारायला पोलीस स्टेशनला जात होता, तेव्हा तपास चालू आहे, सापडला की कळवू हे ठराविक साच्याचे उत्तर बिरदेव ला मिळत होते. हाच बिरदेव आज भारतीय पोलीस सेवेच्या सर्वात उच्च पदासाठी निवडला गेला आहे. स्वतः भोगलेल्या हालअपेष्टा आणि उपेक्षा आणि उपसलेले कष्ट यांची जाणीव ठेऊन तो देशसेवा करेल याबाबत मनात तीळमात्र शंका नाही.

## एल्गार पुकारा आणि रक्ताच्या प्रत्येक थेंबाचा बदला घ्या : खेडकर, मोरे

शिरूर कासार । प्रतिनिधी

आज शिरूर कासार शहरातील जिजामाता चौकामध्ये पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्यामध्ये निष्पाप लोकांना जीव गमावावा लागला. या भ्याड हल्ल्याचा शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे. 'पहलगाम' येथे झालेला हल्ला हा केवळ दहशतवाद नव्हे, तर मानवतेवरचा घृणास्पद आघात आहे.

निष्पाप बांधवांवर भ्याडपणाने करण्यात आलेला हा क्रूर हल्ला आम्ही संतप्त मनाने निषेध करतो. आम्ही सरकारला थेट सवाल करतो, आता पुरे झालं! दहशतवाद्यांवर केवळ शब्दांनी नव्हे, तर कडक कारवाईने उत्तर दिलं पाहिजे! देशातील प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची आहे, आणि ती चोखपणे पार पाडली गेली पाहिजे. आता केवळ श्रद्धांजली नाही, आता हिशोब हवा आहे.

शहीदांच्या बलिदानाचं सार्थक कधी होणार? या हल्ल्यामागे असलेल्यांना शोधून काढा, आणि अशा शिक्षा द्या की पुन्हा कोणी भारताच्या दिशेने बोट उचलण्याची हिंमत करू नये! शहीदांना भावपूर्ण श्रद्धांजली पण या वेळी, केवळ शब्द नाही – आम्हाला कृती हवी आहे! शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिरूर कासार, लालाभाई पठाण, राजेश कोकणे, नामदेव आढाव, आनंदगावचे मा.सरपंच प्रल्हाद विघ्ने, पत्रकार प्रकाश साळवे, संदिप डोंगरे, सारंग बडे, योगेश बडे, आक्षय पुलावळे, कैलास पानसंबळ, आजय खाडे तसेच तालुक्यातील सर्व शिवसैनिक यावेळी उपस्थित होते.



बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्हाधिकारी पदाचा पदभार घेतल्यानंतर साहेबांचा सत्कार करताना व बैलगाडी सप्रेम भेट देताना सामाजिक कार्यकर्ते इंजिनियर सादिक इनामदार व लोकशाचे उपसंपादक अभिजीत नखाते.

## गोदाई माता सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

सिरसदेवी । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील कोल्हेर या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबीर गोदाई माता सामाजिक प्रतिष्ठान च्या वतीने दि. २६/०४/२०२५ रोजी कोल्हेर या ठिकाणी ठेवण्यात आला असून या रक्तदान शिबिरास मोठया संख्येने उपस्तित राहण्याचे आव्हान प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात आले आहे.

क्रांती सूर्य महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर दि.२६/०४/२०२५ शनिवार रोजी सकाळी ०८.०० वाजता कोल्हेर ता.गेवराई या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ सर्वांनी घेऊन रक्तदान करावे. रक्तदान हे सर्वांश्रेष्ठ दान असून अनेक युवकांनी रक्तदान करावे असे आव्हान सामाजिक प्रतिष्ठान वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन गोदाईमाता सामाजिक प्रतिष्ठान चे उपाधक्ष श्री.विनोद गायकवाड यांनी केले आहे तसेच या शिबिरास शासकीय रुग्णालय बीड येथील डॉकटर काळे साहेब व त्यांच्या टीमचे आणि कोल्हेर चे सरपंच राधेश्याम चक्कर व रीपाई अध्यक्ष यांचे सहकार्य लाभणार आहे. तसेच गोदाईमाता सामाजिक प्रतिष्ठान चे उपाध्यक्ष विनोद गायकवाड, सुनील जाधव, सुनील काळे, स्वप्नील काळे, रमेश सुतार, अर्जुन सुतार, गणेश सुतार, सचिन पवार, अर्जुन गायकवाड, युवराज गायकवाड, तुकाराम गायकवाड, सुमित अडागळे, व शासकीय रुग्णालय बीड डॉ.कुमार सर, गणेश रोटे सर, संतोष गायकवाड सर, नीलकांत नवगिरे सर, उत्तम राऊत सर या सर्वांचे योगदान असणार आहे.

## लोकशाही पत्रकार संघाच्या हलिमा अल्लाबक्ष शेख यांची निवड जाहीर

पुणे । प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार महाराष्ट्र राज्य हलिमा अल्लाबक्ष शेख, पाटील इस्टेट, गल्ली नं ६, मुंबई पुणे रोड, शिवाजीनगर, पुणे बचत गट कार्य संपूर्ण महाराष्ट्र मध्ये आहे. या कार्याची दाखल घेऊन हलिमा अल्लाबक्ष शेख यांची निवड प्रदेश उपाध्यक्ष, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, श्रद्धा कंडूडे प्रदेश अध्यक्ष,संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती, श्री उमाकांत गव्हाणे चित्रपट दिग्दर्शक, श्री पांडुरंग साळुंखे पुणे जिल्हा अध्यक्ष यांनी संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, आयेशाखान मुलानी, निलोफर शेख प्रदेश अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र, प्रदेश अध्यक्ष उद्योग विकास समिती मनीषा धिरडे,प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, साजेद सय्यद, अनिस कुरेशी यांच्या आदेशानुसार केली. या यावेळी संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य म्हणाले की, पाटील ह्या ब्युटी पार्लर, टेलरिंग, अशा विविध उद्योग क्षेत्राततसेंच कलासेस च्या माध्यमातून महिला आपल्या पायावर उभा करीत आहेत. उद्योगाच्या माध्यमातून अनेक महिलांना रोजगार निर्मिती करणार आहे. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन निवड केली आहे. तसेंच लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकारांच्या आणि महाराष्ट्र मधील तमाम सर्व सामान्य नागरिकांचे देखील विविध मागण्या शासन दरबारी मांडून मंजूर करून घेणार आहेत. विविध समित्या स्थापन करून महाराष्ट्र राज्यात तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल.



विविध कार्यक्रम साजरे केले जातील. एक वेगळा ठसा उमटवण्याचा लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल.

नवनिर्वाचित पदाधिकारी हालिना शेख म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्र मध्ये पत्रकारांची फळी तयारी करून मोठी ताकत निर्माण करून उद्योग क्षेत्रात देखील मोठी क्रांती उद्योग उभारून करू. महिलांना विविध उद्योगाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक सक्षम करू. मला खात्री आहे की, शासन सर्व तो परी सहकार्य करील, असेही निवडी प्रसंगी शेख बोलत होते. हालिना शेख यांचा आय कार्ड, निवड पत्र देऊन सत्कार करून संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार, प्रदेश अध्यक्ष मनीषा धिरडे – उद्योग विकास समिती, मराठवाडा उपाध्यक्ष दत्ता भाऊ नरनाळे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य, संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, पांडुरंग साळुंके पुणे जिल्हा अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष सरपंच ग्रामपंचायत विकास समिती सखाराम पोहीकर, मराठवाडा उपाध्याक्ष बाळासाहेब फपाळ, नांदेड जिल्हा सचिव बाजीराव गायकवाड, शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष, नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले सोलापूर शहर सचिव, जस्मित तोमर – नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, मराठवाडा युवक अध्यक्ष दिपक भाऊ थोरात, प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

## मेस्टाचा राज्यस्तरीय बेस्ट स्कूल अवॉर्ड श्री व्यंकटेश इंटरनॅशनल स्कूलला प्रदान

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील श्री व्यंकटेश इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलला ग्रामीण भागात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मेस्टाचा राज्यस्तरीय बेस्ट स्कूल अवॉर्ड ठाणे येथे झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते नुकताच प्रधान करण्यात आला आहे. याबद्दल परिसरातील शिक्षण प्रेमी, प्रतिष्ठित नागरिक, व पालकांच्या वतीने संस्थाध्यक्ष कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.





ठाणे येथे डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात मेस्टाचे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच पार पडले. या अधिवेशनासाठी मेस्टाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय तायडे पाटील, कोकण विभाग शिक्षक आ. ज्ञानेश्वर म्हात्रे, ठाण्याचे आ. निरंजन डावखरे, आ. संजय केळकर, प्रदेशाध्यक्ष डॉ. नामदेवराव दळवी, कार्याध्यक्ष प्रा. विजय पवार, राज्य संघटक अनिल असलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा दिमाखदार सोहळा पार पडला. ग्रामीण भागासाठी दिला जाणारा बेस्ट स्कूल अवार्ड २०२५ बीड जिल्ह्यातून पिंपळनेर येथील श्री व्यंकटेश इंटरनॅशनल स्कूला ग्रामीण भागात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल प्रदान करण्यात आला. हा सेवा गौरव पुरस्कार संस्थेच्या वतीने संस्थाध्यक्ष प्रा. सुरेश सावंत यांनी स्विकारला. दरम्यान व्यंकटेश इंग्लिश स्कूलने गतकाही वर्षापासून पिंपळनेर परिसरात शैक्षणिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला आहे. या अधिवेशनासाठी बीड जिल्हाध्यक्ष अखिलेश ढाकणे, पांडुरंग चांडक, डॉ. मेघराज पिंगळे, मराठवाडा संघटक श्रीमंत सानप, संतोष पटाईत, डॉ. राजीव घुगे, प्रा. नजीर पठाण, सचिव ज्ञानेश्वर तांबे, प्रा. मस्के, प्रा.धायतडक, प्रा. लाटे यांची उपस्थिती होती.



## साहिल साबळे यांची भारतीय सैन्य दलात निवड

**जिल्हा परिषदेत माध्यमिक मुलांच्या शाळेतील एनसीसी कॅडेट**

गेवराई । प्रतिनिधी

सैन्य भरतीचं स्वप्न उराशी बाळगलं होतं, त्या दृष्टीने त्याचे प्रयत्नही सुरु होते. आजअखेर त्यांचं सैन्य भरतीचं स्वप्न पूर्णत्वाला आलं आहे. त्याची जिद्द, मेहनत फळाला आली आहे. साहीलच्या या कामगिरीबद्दल मित्र परिवार व परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. आम्हा सर्वांना साहिलच्या या निवडीचा सार्थ अभिमान असल्याचं मत परिवारांनी व्यक्त केले.

साहिलच्या सैन्य दलातील निवडीने आम्ही खूप आनंदी झालो आहोत. ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. साहीलला हे यश सहजासहजी मिळालेलं नाही, त्यानं यासाठी प्रचंड कष्ट घेतले आहेत. आज माझ्या मुलांच्या निवडीनं ऊर अभिमानाने भरुन आला आहे. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची गेवराई येथील एनसीसी कॅडेट व विद्यार्थी साहिल साबळे याची भारतीय सैन्यदलात निवड झाल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक राजकुमार पोपळघट, एनसीसी विभाग प्रमुख लेफ्ट प्रवीणकुमार पंडित, तलाह कादरी सर, राऊत सर, गायकवाड सर, कुडके सर, गवळी सर, राठोड सर, विशाल काळे सर, झेंडेकर सर, करवंदे सर, पवार सर, पठाण सर, श्रीमती बनसोडे मॅडम, पाठक मॅडम, रसाळ मॅडम, होळकर मॅडम, राक्षे मॅडम आदींनी सबंधित विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## चंपावतीरत्न पुरस्काराचे नामविस्तार आणि आयोजनासाठी सामाजिक संघटनांनी पुढे यावे

### मनोभावी मित्राच्या स्मरणासाठी एस.एम.युसूफ यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

दिवंगत अजातशत्रू अवलिया हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांच्याकडून देण्यात येणाऱ्या चंपावतीरत्न पुरस्काराचे त्यांच्या मृत्यू पश्चात हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी चंपावतीरत्न पुरस्कार असे नामविस्तार करून ते वितरित करण्यासाठी सामाजिक संघटनांनी पुढे यावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी हे समज आल्यापासून सामाजिक चळवळींमध्ये सहभागी झाले होते. सत्ताधाऱ्यांनी घेतलेल्या समाजविरोधी निर्णयाचा ते सदैव कडाडून विरोध करत असायचे. यामुळे त्यांना डाव्या विचारसरणीचा म्हणून ओळखले जायचे. तरुणपणी ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात कॉम्रेड अतहर बाबर, सय्यद मोईनुद्दीन मास्टर, ड. उषा दराडे, प्रा. सुशीला मोराळे, नामदेवराव चव्हाण यांच्यासोबत अनेक वर्षे सक्रिय होते. यापैकी अतहर बाबर यांचे अनेक वर्षांपूर्वी निधन झाले तर नामदेवराव चव्हाण वगळता इतरांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सोडून इतर पक्षात प्रवेश केला. हे सर्वजण आजही राजकारणात सक्रिय आहेत. डाव्या पक्षातील या घडामोडी नंतर हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी व्यथित झाले होते. म्हणून त्यांनीही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सोडून स्वतः समांतर कॉंग्रेस



पक्षाची स्थापना केली होती. आज लोकांना आश्चर्य वाटेल रेड्डी साहेबांच्या याच समांतर कॉंग्रेस पार्टी मध्ये आष्टी–पाटोदा मतदार संघातून अनेकदा निवडून आलेले माजी आमदार भीमराव धोंडे सुद्धा होते. रेड्डी यांचे व्यक्तिमत्व असे होते की, त्यांना राजकीय वाटाघाटी जमत नसायच्या. ते सदैव आपल्या तत्त्वांवर, निश्चयावर ठाम राहायचे. यामुळे त्यांना या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून त्या पक्षात असे करणे कधीही जमले नाही. म्हणून ते एकटेच राहिले मात्र त्यांच्यातील परखड वक्ता समाजासाठी असलेली त्यांची तळमळ वाया जाऊ नये म्हणून एआयएमआयएम पक्षाचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष शेख निजाम यांनी त्यांना विनंती करून पक्षात यायचे निमंत्रण दिले. रेड्डी साहेबांना या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार बॅरिस्टर अल्हाज असदुद्दीन ओवैसी यांचे परखड विचार आवडायचे त्यात निजाम यांनी दिलेल्या निमंत्रणामुळे त्यांनी एआयएमआयएम पक्षात निधन होण्याच्या काही वर्षांपूर्वी पक्ष प्रवक्ता म्हणून प्रवेश केला होता. तिथेही त्यांनी आपल्या सडेतोड आणि परखड भाषणांनी मैदान मारले होते. त्यांच्या या खुबीमुळे अल्पावधीतच ते बीड शहरापासून ते जिल्हाभरात आणि जिल्ह्यापासून ते हैदराबाद पर्यंत नावाजले गेले होते. एकीकडे त्यांची वाटचाल अशी सुरू असताना दुसरीकडे समाजातील प्रत्येक क्षेत्रात समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचे कार्य समाजासमोर यावे, त्यांच्या चांगल्या कार्याचा समाजाला परिचय व्हावा, त्यांच्या पाठीवर समाजाच्या कौतुकाची थाप पडावी. या दृष्टिकोनातून ते चांगले कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना दरवर्षी चंपावतीरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करायचे. विशेष म्हणजे या चंपावतीरत्न पुरस्कारासाठी त्यांच्याकडे कोणाचीही शिफारस किंवा पैसा चालायचा नाही. समाजात वावरताना ते स्वतःच ज्याला पुरस्कार द्यायचे आहे, त्याच्यावर नजर ठेवून त्याची पारख करायचे. स्वतःचे समाधान झाल्यावरच ते अशा व्यक्तीला चंपावतीरत्न पुरस्कार द्यायचे. चार वर्षांपूर्वी त्यांचे निधन झाल्याने चंपावतीरत्न पुरस्कार सोहळा थांबला आहे. हा पुरस्कार सोहळा बंद होऊ नये. निदान या पुरस्कार सोहळ्यानिमित्ताने तरी हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी यांचे स्मरण समाजात सदैव रहावे. समाजात चांगले कार्य करणाऱ्यांचे या पुरस्काराच्या माध्यमातून कौतुक व्हावे म्हणून चंपावतीरत्न या पुरस्काराचे 'हॅरिसन फ्रान्सिस रेड्डी चंपावतीरत्न पुरस्कार' असे नामविस्तार करून ते दरवर्षी रेड्डी साहेबांच्या जयंती किंवा पुण्यतिथी दिना दिवशी वितरित करण्यात यावे. यासाठी तळमळीच्या सामाजिक संघटनांनी पुढे यावे. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

# आष्टी तालुक्यातील खडकत गावात झेंडा लावण्याच्या कारणावरून दोन गटात तुफान दगडफेक!

## दोन्ही बाजूने झालेल्या दगडफेकीत गावातील नागरिक जखमी; गावात तणाव निर्माण झाला होता
## बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या घटनेमध्ये वाढ; पोलीस प्रशासन गुन्हेगारी रोखण्यात अयशस्वी?

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील खडकत गावात किरकोळ वादातून दोन गटांमध्ये जोरदार दगडफेक व हाणामारी झाली असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. या घटनेत काही व्यक्ती जखमी झाल्याचे समजते. सदर वाद गावातील चौकात लावलेल्या झेंड्यावरून उफाळून आला होता. त्याचे पडसाद अधिक तीव्रतेने पाहायला मिळाले. घटनेनंतर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. दोन्ही समाजांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रशासनाने शांतता बैठकीचे आयोजन केले आहे. मात्र, सध्या खडकत गावात तणावपूर्ण वातावरण आहे.

दोन गट आपसात भिडल्या मुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या दरम्यान गावातील सुमारे २०० ते ३०० तरुणांनी रस्त्यावर एकमेकांच्या दिशेने जोरदार दगडफेक केली. तर काहींनी हातात लाकडी दांडे आणि शस्त्र घेऊन दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. या सर्व घटनांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या दगडफेकीत काहीजण जखमी झाले असल्याची माहिती



देखील मिळत आहे. दरम्यान सध्या गावात तणावपूर्ण शांतता असल्याची माहिती सूत्रांच्या वतीने देण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटना वारंवार समोर येत असतात. त्यातच संतोष हत्या प्रकरण आणि खोक्या प्रकरण ताजे असतानाच आता बीड जिल्ह्यातील आष्टी गावात दोन गट परस्परांशी भिडले असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात बीड ची ओळख आता गुन्हेगारी जिल्हा म्हणून होताना दिसत आहे.

### दगडफेकीत गावातील नागरिक जखमी

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार आष्टीच्या खडकत गावामध्ये एका चौकात झेंडा लावण्या वरून हा वाद सुरू झाला. हा वाद अति टोकाला पोहोचल्यानंतर दोन गटामध्ये मोठ्या प्रमाणात दगडफेक देखील झाली. दोन्ही बाजूने झालेल्या दगडफेकीत गावातील नागरिक जखमी झाले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला होता. अखेर पोलिस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. सध्या या गावात मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला असून गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# विकास बनसोडे खून प्रकरणात आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर झाला

बीड । प्रतिनिधी

दिनांक १४ मार्च २०२५ रोजी होळीच्या सणाला घुमरी पिंपरी तालुका आष्टी जिल्हा बीड येथे आरोपीने मयत विकास बनसोडे राहणार बोरगाव तारू तालुका भोकरदन जिल्हा जालना यास आरोपीने बोलून घेतले आणि त्यांच्या मुलीचे प्रेम संबंध अनुसूचित जातीच्या विकास बनसोडे सोबत असल्यामुळे स्वतःची प्रतिष्ठा आणि सन्मान धुळीस मिळेल या भीतीने विकास बनसोडे यास १४ मार्च २०२५ च्या संध्याकाळी सहा वाजता ते १५ मार्च २०२५ च्या दुपारी एक वाजेपर्यंत जवळपास वीस तास मारहाण केली. ही मारहाण निरघुण पद्धतीने केली आणि विकास बनसोडे चा निर्गुण खून जातीय दोष भावनेने झालेला आहे.



मयत विकास बनसोडे चा भाऊ आकाश बनसोडे यांनी दिनांक १६ मार्च २०२५ रोजी आष्टी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आठ पुरुष आणि दोन महिला सह दहावी हत्याचा गुन्हा नोंद करण्यात आला. तसेच ट्रॉसिटी क्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. आष्टी पोलिसांनी आरोपीस तात्काळ अटक करून सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. दहा रुपये पैकी आठ पुरुष आणि दोन महिला आरोपी आहेत. दोन महिला आरोपी स्वाती भाऊसाहेब शिरसागर आणि सुवर्णा बाबासाहेब शिरसागर यांनी जामीन अतिरिक्त सत्र न्यायालय बीड येथे दाखल केला होता. या महिलाचा गुन्ह्याशी काहीही संबंध नाही त्यांनी फक्त मताला शिवीगाळ केली आहे. त्यामुळे आरोपीस जामीन वर सोडावे अशी विनंती आरोपीच्या वकिलांनी केली होती. फिर्यादीचे वकील करण शिंदे यांनी माननीय न्यायालयास विनंती केली की हा खून जातीय द्वेष भावनेने केलेला ऑनर किलिंगचा प्रकार आहे हा निर्गुण खून आरोपीने खोट्या प्रतिष्ठेमुळे केलेला आहे.

मयत विकासचा खून हा दुर्मिळातील दुर्मिळ हत्या आहे त्याच्या शरीरावर तीस ते चाळीस जखमा असून सतत वीस तास मारहाण केल्यामुळे या हत्येस सर्वच आरोपी जबाबदार आहेत अशी मांडणी फिर्यादीची वकील ॲड.करण शिंदे यांनी न्यायालयासमोर प्रभावीपणे केली त्यामुळे अतिरिक्त सत्र न्यायालय बीड यांनी आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केलेला आहे. ॲड. करण शिंदे यांचे अभिनंदन ॲड.भीमराव चव्हाण, ॲड.हर्षल बहिर, ॲड. अक्षय मुळे, ॲड.अभिजीत कदम, ॲड.सचिन केकान, ॲड.अझहर शेख यांनी केले आहे.



काश्मीरच्या पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध वंचित बहुजन आघाडीच्या वतीने व्यक्त करत या हल्ल्यातील मृतांच्या नातेवाईकांच्या पाठीशी संपूर्ण देश ठामपणे उभा आहे. दहशतवाद्यांनी विकृत मानसिकता संपवावी, शहीद झालेल्या पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली त्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, सामाजिक कार्यकर्ते श्यामसुंदर जाधव, इंजि. संदेश डोळस, पँथर दीपक कांबळे, युवक उपाध्यक्ष उमेश तुळवे, ता.अध्यक्ष किरण वाघमारे, श.अध्यक्ष लखन जोगदंड, प्रेम कांबळे, सिकंदर सरवदे, मिलिंद सरपते, विशाल सूर्यवंशी, निलेश वाघमारे, देविदास वाघमारे, प्रताप धनवे, सौरभ अवसरमल, विकी बोराडे इत्यादी उपस्थित होते.

# प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा : आ.विजयसिंह पंडित

## ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून किंवा सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी ३० एप्रिल पर्यंत करून घ्यावी

गेवराई । प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सद्या सर्व्हे सुरु असून गेवराई विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी सद्या सुरू असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केले आहे.



प्रसिद्धी पत्रकात पुढे ते म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी गेवराई विधानसभा मतदारसंघात सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. एक ते दहा निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी. नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिल ही शेवटची तारीख असून त्या अगोदर गेवराई विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

### अशी करावी नोंदणी

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी aawas plus २०२४ हे शासनाचे अधिकृत अँप प्ले स्टोअर्सवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टोल करावे. नंतर ररवहरी त्र्व्लश ीव अँप देखील इंस्टॉल करून घ्यावे. त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून अँपवर विचारलेली माहिती भरून शेवटी आपल्या कच्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा. आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

# पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बीड तालुका काँग्रेस पक्षाकडून तीव्र निषेध

## मानवतेला काळीमा फासणारी घटना : गणेश बजगुडे पाटील

बीड । प्रतिनिधी

काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बीड तालुका काँग्रेस व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत हा हल्ला अतिशय भ्याड व मानवतेला काळीमा फासणारा असुन हल्लेखोरांवर तत्काळ कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसचे नेते व शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे. काश्मीर येथील पहलगाम येथे



पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २७ निरपराध भारतीय पर्यटकांवर गोळ्या झाडून हत्या केली. ही घटना अतिशय निंदनीय व मानवतेला काळीमा फासणारी असुन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, गृहमंत्री अमित शहा यांनी यावर कठोरात कठोर भुमिका घेवुन ठोस उपाय योजना करायला हव्यात. जातीय धार्मिक तेढ निर्माण करून भ्याड हल्ले करणाऱ्यांवर सरकारने कारवाई तर करावीच परंतु देशाच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजना देखील करायला हव्यात. या दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या सर्व भारतीयांना बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ परमेश्वर देवो असेही गणेश बजगुडे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# दिव्यांगाच्या कागदपत्राची घरीच होणार पडताळणी

बीड । प्रतिनिधी

दिव्यांग निराधार व विविध योजनेतील लाभार्थ्यांना अपंगत्वामुळे हालचाल करता येत नसेल किंवा तहसील कार्यालयात येता येत नसेल तर अशा लाभार्थ्यांच्या कागदपत्राची (डीबीटी) आता घरीच पडताळणी होणार असून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार सुहास हजारे यांनी केले आहे.



संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजना, दिव्यांग लाभार्थी अतिवृद्ध व्यक्ती, असतील ज्यांना हालचाल करणे अशक्य आहे व जे तहसील कार्यालय किंवा डीबीटी कॅम्प साठी येऊ शकत नाहीत. त्यांचे आधार कार्ड, राशन कार्ड, बँक पासबुक आणि मोबाईल नंबर हा ८१४९४६८८८४ या मो. नंबर वर व्हाट्सअप ला कळवा अथवा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी तथा तलाठी व मंडळ अधिकारी यांचे मार्फत तहसीलदार कळवावे, त्यांची (डीबीटी) कागदपत्राची पडताळणी घरबसल्या करून घेतली जाईल. त्यामुळे मित्र, नातलग, परिचित, शेजारी व तालुक्यातील सर्व नागरिकांना हा मेसेज कळवावा असे आवाहन तहसीलदार सुहास हजारे यांनी केले आहे.



मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर यांनी नुकतीच वडवणी शहरातील तालुका मराठी पत्रकार परिषदेचे सचिव पत्रकार महेश सदरे यांच्या आई श्रीमती निलावती सदरे यांचं अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले होते. सदरे यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबाच सांत्वन केले. यावेळी डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे जेष्ठ पत्रकार सुधाकर पोटभरे, तालुकाध्यक्ष सतिश सोनवणे, पत्रकार विजय राऊत सह आदी उपस्थित होते.

# परळी तालुक्यातील पांगरीचा व भाजीपाला विकणाऱ्या आईचा मुलगा झाला IPS

## क्लासेस मधून बाहेर काढलेला अक्षय मुंडे जिद्दीने IPS झाला



परळी वै. । प्रतिनिधी

परळी तालुक्यात यशाचा झेंडा हसता हसता ळझडअक्षय मुंडे अचानक इमोशनल झाला परळी तालुक्यातील मोजे पांगरी अत्यंत गरीब कुटुंबातील असलेला एक होतकरू मुलगा अक्षय मुंडे यांनी जिद्दीने व अभ्यास करून डॉ.बाबासाहेबआंबेडकर यांनी शिका असे सांगितल्यामुळे मी शिक्षणामध्ये कमी पडलो नाही मला क्लासेस वाल्याने माझ्यापाशी भरण्यासाठी पैसे नव्हते यासाठी त्याने क्लासच्या बाहेर काढले होते. त्यामुळे मी अभ्यास पूर्ण वेळ करीत होतो.

मी स्वतःआई सोबत भाजीपाला विकत होतो माझ्या घरची परिस्थिती गरीब असल्यामुळे मला शिक्षणासाठी पैसे नसायचे त्यासाठी मी लायब्ररीमध्ये जाऊन मोबाईल माझा बंद ठेवून मी पूर्ण वेळ अभ्यास साथ घालत होतो. सध्या विद्यार्थ्यांनी सोशल मीडिया मोबाईल मोजका व थोडा वापरून बंद ठेवावा असे त्यांनी सत्कार वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी अक्षय मुंडे यांचा पांगरी ग्रामस्थ गावामध्ये वाजत गाजत त्यांची मिरवणूक काढण्यात आली गावकऱ्यांच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. त्याच्या जिद्दीला व चिकाटीला यश मिळाले आहे. सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यास करून आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावेत अशा सूचना अक्षय मुंडे यांनी विद्यार्थी व विद्यार्थ्यांना सूचना केल्या. यावेळी उपस्थित असलेल्या सर्वांनी त्यांचे सत्कार करण्यात आला आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT